# ECHO OF HIS CALL

# बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE
REACHING NATIONS

India's National Spiritual Newspaper

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHAUL BENJAMIN SHINDE

VOL: XXVI YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, 2025 JANUARY No. 12


## पवित्र शास्त्र

कृपया हा शास्त्र भाग पाठ करा

स्तोत्र : १०१:१-८

१. प्रेमदया आणि न्याय यांविषयी मी गाईन; तुला, हे यहोवा, मी स्तुती गाईन.

२. परिपूर्ण मार्गात मी शहाणपणाने वागेन; अहा, तू माझ्याजवळ केव्हा येशील? मी आपल्या घरामध्ये परिपूर्ण हृदयाने चालेल.

३. मी आपल्या डोळ्यांपुढे काही अनुचित गोष्ट ठेवणारच नाही; भलतीकडे वळणाऱ्यांचे काम मी द्वेषतो; ते मला बिलगणार नाही.

४. कुटील हृदय माझ्यापासून दूर निघून जाईल; मी कोणत्याही वाईट गोष्टीची ओळख करून घेणार नाही.

५. जो कोणी गुप्तपणे आपल्या शेजाऱ्यावर आळ घालतो त्याला मी नष्ट करीन; जो चढेल दृष्टीचा आणि गर्विष्ठ हृदयाचा त्याचे मी सहन करणार नाही.

६. देशातले विश्वासू यांनी माझ्याजवळ राहावे म्हणून माझी नजर त्यांच्यावर राहील; जो परिपूर्ण मार्गात चालतो तोच माझी सेवा करील.

७. जो कपट करणारा तो माझ्या घरामध्ये राहणार नाही; जो लबाड बोलणारा तो माझ्या डोळ्यांपुढे स्थापला जाणार नाही.

८. सर्व अन्याय करणाऱ्यांस यहोवाच्या नगरातून छेदून टाकावे म्हणून देशातल्या सर्व दुष्टांस मी रोज सकाळी नष्ट करीन.

# प्रभु येशू ख्रिस्त

## तुम्हाला दिलेल्या त्याच्या अभिवचनांचे स्मरण करील!

THE LORD JESUS CHRIST WILL REMEMBER HIS PROMISES TO YOU!

*सन्माननीय प्रमुख संपादक, रेव्ह. अ‍ॅन्जेलाइन सेल्वाकुमारी*



माझ्या सर्व विस्तारित **एको ऑफ हिज कॉल** परिवाराला नवीन वर्षाच्या खूप खूप शुभेच्छा!

मी प्रार्थना करते की, या वर्षामध्ये देव तुमची, तुमच्या कुटुंबाची आणि तुम्ही त्याच्यासाठी करीत असलेल्या चांगल्या कामाची आठवण करील.

पवित्र शास्त्र आपल्याला खात्री देते की, आपला देव वचन पाळणारा आहे. त्याने घोषित केले आहे की, **"जे मी तुला सांगितले आहे ते मी करीपर्यंत मी तुला सोडणार नाही."** (उत्पत्ती २८:१५). देव जेव्हा अभिवचन देतो, तेव्हा तो त्याच्या योग्य वेळेत पूर्ण करण्यास विश्वासू असतो. त्याच्या वेळेचा उलगडा एका दिवसात, एका आठवड्यात, एका महिन्यात, एका वर्षांत किंवा अगदी पिढ्यांनपिढ्या होऊ शकतो. तथापि, त्याचे वचन नेहमीच पूर्ण होईल.

मी प्रार्थना करते की, २०२५ हे तुमचे कैरोस वर्ष असेल, म्हणजेच देवाची अभिवचने तुमच्या जीवनात प्रकट होण्यासाठी त्याने नियुक्त केलेली वेळ.

(...पान ३ वर)




एको ऑफ हिज कॉल

यू ट्युब ख्रिश्चन चॅनल !

पास्टर सॅम सेल्वा राज यांच्या सोबत प्रार्थनेत

सहभागी होण्याची संधी

पाच मिनिटांचा संदेश

इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु

प्रतिदिनी - पहाटे २.०० वाजल्या पासून

रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी

* कृपा करुन सबक्राईब करा *

# ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)

REACHING NATIONS



## तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...



**आमचे कार्याविषयीचे धोरण**

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.


**HON. EDITOR-IN-CHIEF**
Rev. Angeline S. Kumari, M.A., M.Sc., M.Ed.

**HON. MANAGING EDITOR**
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.

**GENERAL MANAGER**
Bro. N. Prakasam, M.A., M.Sc.(C&P), PGDHRM., MBA.

**ADMINISTRATION**
Sis. Jesy Veena Sam
Adv. K. Puratchivendan, M.Com., C.A., B.L.
Dr. P.E.R. Premchand, M.Sc., M.A., M.Ed., Ph.D.
Dr. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM), Ph.D.
Dr. Rabinder Boaz, M.S. (CMC)

**EDITORIAL BOARD**
Dr. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Sis. Sajini Cherian
Rev. Dr. K.R. Rajasekaran
Rev. Dr. William Robert, Ph.D., DD, D.Lit.

**EDITOR, PUBLISHER & PRINTER**
Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 98412 71858 95661 31858

**E.MAIL**
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in

**WEBSITES**
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com

**YOUTUBE CHANNEL**
Echo of His Call


**.... तुझी कोठारे समृद्धीने भरतील, आणि तुझी कुंडे नव्या द्राक्षारसाने भरून वाहतील. – (नीतिसूत्रे ३:१०)**

प्रभूमध्ये देवाच्या प्रिय मुलांनो!

तुम्हाला आमचा प्रेमपूर्वक सलाम. आम्ही तुमच्या दैनंदिन सुरक्षेसाठी आणि तुमच्या जीवनाच्या उन्नतीसाठी निरंतर प्रार्थना करतो. गेल्या वर्षभरातील तुमच्या आवेशपूर्ण प्रार्थना आणि उत्साहपूर्ण पाठिंब्याबद्दल तुमचे आभार. तुम्ही सर्व बरे आहात असा आम्ही विश्वास व्यक्त करतो.

गेल्या वर्षभरातील आमच्या सेवेचा मार्ग देवाच्या चांगुलपणाने भरलेला होता. तथापि, परमेश्वराने आम्हाला यार्देन नदीसारख्या परीक्षांवर आणि लाल समुद्रासारख्या वेदनांवर मात करण्यास मदत केली, जी अन्यथा मानवी शक्तीने मात करणे शक्य नव्हते.

कदाचित तुमच्या जीवनात सुद्धा असेच असावे! पण घाबरू नका. देव तुमच्यासाठी लढत आहे, तुमच्या पाठीशी उभा आहे आणि पुढेही लढत राहील. ''**कारण यहोवा असे म्हणतो, वारा तुम्ही पाहणार नाही, पाऊसही तुम्ही पाहणार नाही, तथापि ते खोरे पाण्याने भरून जाईल, आणि तुम्ही प्याल, तुम्ही व तुमची पाठाळे व तुमची गुरेही पाणी पितील.**''- २ राजे ३:१७.

**याकरिता प्रभू यहोवा असे म्हणतो, ''पाहा, मी सीयोनात आधारासाठी धोंडा, पारखलेला धोंडा, कोपऱ्याचा मोलवान धोंडा, स्थिर पाया म्हणून घालतो; जो विश्वास धरतो तो घाई करणार नाही.**'' - यशया २८:१६. चिंताग्रस्त होऊ नका. तुमच्यासाठी सुद्धा देव चमत्कार करील. पर्वत निघून जातील आणि डोंगर ढळतील आणि मध्य समुद्रात ढकलले जातील, पण त्याची कृपा सरून जाणार नाही. ''**कारण पर्वत निघून जातील आणि डोंगर ढळतील परंतु माझी प्रेमदया तुझ्यावरून सरून जाणार नाही, आणि माझा शांतीचा करार ढळणार नाही, असे यहोवा, जो तुझ्यावर दया करतो, तो म्हणतो**''- यशया ५४:१०. तुम्हांला पडण्यापासून वाचवणारा देव तुमच्याबरोबर आहे; हिंमत धरा. तुमच्यामुळे प्रत्येक चांगली गोष्ट या वर्षाच्या शेवटी तुमच्यापर्यंत निश्चित पोहोचेल.

आपल्या सेवेचा मार्ग कठीण आहे. शत्रूशी लढत राहिल्याने आम्ही दुर्बळ झालेले आहोत. परंतु देव आम्हांस उचलून धरतो. ''**कारण न्यायी सात वेळा पडतो तरी तो पुन्हा उठतो, परंतु दुष्ट अरिष्टात विध्वंस पावतील.**'' - नीतिसूत्रे २४:१६. आणि म्हणून आम्ही निराश झालेले नाही आहोत. देवाचे सामर्थ्य आम्हांस उचलून धरते.

तुमच्या उत्कट प्रार्थनेसाठी आणि आमच्या **एको ऑफ हिज कॉल** या सेवेकरिता संतोषपूर्ण दानार्पणासाठी आम्ही आपल्याला विनंती करतो. तसेच, देवाच्या इतर सेवकांना देखील साहाय्य करण्यास विसरू नका. देव तुम्हाला अधिकाधिक आशीर्वादित करो... आमेन!

तुम्हा सर्वांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!


ख्रिस्त येशूमध्ये तुमचे दास

**अॅलेक्स सॅ मसन सॅम**
**पास्टर एस्. सॅम सेल्व राज**

(+91) 98412 71858 / 98410 71858,
E.mail : sam@echoofhiscall.org



**Our Ministries:** ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) ✪ BIBLECOR - Postal Courses (3 languages) ✪ YouTube Ministry ✪ Online Courses ✪ Theological Correspondence Courses (2 languages) ✪ Church Planting ✪ Nehemiah Bible Colleges ✪ Gospel Printing Press ✪ Great Commission Partners ✪ St. Paul's Matriculation School ✪ Crusades ✪ Community Development

## कृपया इथे लक्ष द्या!

आमचे **एको ऑफ हिज कॉल** यूट्युब चॅनलवर आमचे ५ मिनिटांचे मननपर संदेश दररोज पहाटे २.०० वाजता तामिळ, तेलगू, इंग्रजी आणि हिन्दी या भाषांमध्ये प्रसारीत होत असतात. ते संदेश ऐकून तुम्ही देवाची कृपा प्राप्त करु शकता.

आणखी माझे मोबाईल क्रमांक ९८४१०७१८५८, आणि ९८४१२७१८५८ (वैयक्तिक) तुमच्या मोबाईलमध्ये जतन करुन ठेवा.

**- पास्टर एस्. सॅम सेल्वा राज**

(पान १ वरुन...)

### नैराश्येच्या प्रसंगी निकराच्या प्रार्थनेचे पाचारण!

देवाने तुम्हाला अभिवचन दिलेले आहे म्हणून तुम्ही प्रार्थनेत स्थिर राहा आणि फलप्राप्ती होईपर्यंत त्यावर विश्वासाने दावा करा. अनेकदा नैराश्येच्या प्रसंगी तळमळीने आणि तत्परतेने प्रार्थना करण्याची आवश्यकता असते. संपूर्ण पवित्र शास्त्रामध्ये, आपल्याला अशा व्यक्तींची असंख्य उदाहरणे आढळतात, जे त्यांच्या सर्वात कठीण प्रसंगांमध्ये हताश होऊन देवाकडे वळले - आणि त्याने त्यांची आठवण करून प्रतिसाद दिला.

जेव्हा मी म्हणतो की, देव आठवण करतो त्याचा अर्थ तो आपल्याला विसरला असा होत नाही. याउलट, जेव्हा आपण विश्वासाने आणि तत्परतेने प्रार्थना करतो तेव्हा आपल्या प्रार्थनेला प्रतिसाद म्हणून स्वर्ग हेलावून जातो असे यातून सूचित होते. आमेन!



*मी दुःखित आत्म्याची बायको आहे - हन्नाची प्रार्थना.*

मूल होऊ न शकल्याने अति दुःखात असलेल्या हन्नाच्या कथेचा आपण विचार करावा. तिच्या दुःखामध्ये तिने जाहीर केले की, **''मी दुःखित आत्म्याची बायको आहे.''** - १ शमुवेल १:१५. जीव ओतून प्रार्थना केल्यावर तिची मुखचर्या बदलून गेली. पवित्र शास्त्र आपल्याला सांगते की, **''तिचे तोंड उदास नव्हते.''** - १ शमुवेल १:१८, कारण देवाने तिची प्रार्थना ऐकली असा तिने विश्वास ठेवला. देवाच्या स्वभावाप्रमाणे, **''देवाने तिची आठवण केली.''** - १ शमुवेल १:१९, आणि तिने मुलाला जन्म दिला.

आणखी एक प्रभावी उदाहरण म्हणजे हिज्कीया. जेव्हा देवाने त्याला त्याच्या मृत्यूची तयारी करण्यास सांगितले तेव्हा हिज्कीयाने रडून प्रार्थना केली: **''हे यहोवा, मी तुला विनंती करतो, मी कसा तुझ्यापुढे सत्यतेने व पूर्ण हृदयाने चाललो आणि तुझ्या दृष्टीने जे चांगले तेच करीत आलो आहे हे आता आठीव.''** - २ राजे २०:३. तन्मयतेने केलेल्या प्रार्थनेने देवाला कळवळा आला आणि त्याचे आयुष्य वाढले.

नैराश्येच्या प्रार्थनेने देवाच्या हृदयाला स्पर्श केला आणि दैवी हस्तक्षेप करण्यास प्रवृत्त केले यांसारख्या साक्षीने पवित्र शास्त्र भरलेले आहे.

प्रत्येक वेळी लोक प्रार्थना करतात तेव्हा देव त्यांची आठवण करतो. मला माहीत नाही की, गेल्या काही वर्षांत तुमच्यापैकी किती जणांनी रडून प्रार्थना केली की, ''हे प्रभु, तुझ्या प्रेमळ दयेने माझी आठवण ठेव. देवा, माझ्यावर दया कर. कृपया, माझ्याकडे पाहा. माझ्या परिस्थितीकडे लक्ष दे.''

माझ्याकडे तुमच्यासाठी चांगली बातमी आहे! सार्वभौम देव हीच बातमी घोषित करतो: **''माझ्या वचनांतले कोणतेही वचन पुढे लांबणीवर पडणार नाही, तर जे वचन मी बोलतो ते घडेलच, असे प्रभू यहोवा म्हणतो.''** - यहेज्केल १२:२८.

२०२५ मध्ये देव तुमची आठवण करील आणि तुमच्या आयुष्यासाठी, तुमच्या कुटुंबासाठी आणि तुमच्या सेवेसाठी त्याच्या योजना तो पूर्ण करील ही माझी मनापासून प्रार्थना आहे.

देवाने आपली आठवण करावी अशी आपली तीव्र इच्छा असते, त्याप्रमाणे या वर्षाच्या सुरुवातीला काही गोष्टी लक्षात ठेवण्यासाठी तो आपल्याला सुद्धा बोलावतो. तो आपल्याला काही महत्त्वाच्या सिद्धांतांची आठवण करून देत आहे ज्याला घट्ट धरून त्याचे आपण पालन करावे:

### १. परमेश्वराची कृत्ये आणि चमत्कार लक्षात ठेव!

**''मी याहाच्या कृत्यांचे वर्णन करीन, कारण तुझी पुरातन आश्चर्यकर्मे मी आठवीन, तुझ्या सर्व कार्यांचे ध्यानही मी करीन, आणि तुझ्या कृत्यांविषयी चिंतन करीन.''** - स्तोत्र ७७:११-१२.

देवाने आपल्या जीवनात जे चमत्कार केले आणि आशीर्वाद दिले आहेत त्यावर चिंतन करण्यास पवित्र शास्त्र आपल्याला शिकवते. याचे ज्वलंत उदाहरण यहोशवा



*यहोशवाच्या नेतृत्त्वाखाली इस्राएल लोकांनी यार्देन नदी पार केली.*

४ मध्ये आढळते, जेथे यहोशवाच्या नेतृत्वाखाली इस्राएल लोकांनी यार्देन नदी पार केली.

नदी पार करीत असताना, देवाची महत्कृत्ये लक्षात राहावीत म्हणून देवाने त्यांना काहीतरी महत्त्वाचे करण्याची आज्ञा दिली. त्याने प्रत्येक वंशातून एक दगड नदी पात्रामधून उचलून घेण्याची आज्ञा केली. हे दगड देवाच्या विश्वासूपणाचे स्मारक म्हणून उभारण्यात आले.

यहोवा म्हणाला, "**जेव्हा तुमची मुलेबाळे विचारतील आणि म्हणतील, हे धोंडे तुम्हाला काय सुचवतात? तेव्हा तुम्ही त्यांना म्हणाल, यहोवाच्या कराराचा कोश यार्देनेतून पार आला तेव्हा त्याच्या पुढे यार्देनेच्या जलांचा दुभाग झाला.**" (यहोशवा ४:६-७).

वर्ष २०२४ किंवा त्याहूनही आधीच्या वर्षांपासून कोणती स्मारके तुम्ही उभारलेली आहेत? जर इस्राएल लोकांनी यार्देन नदी ओलांडण्याच्या आव्हानाचा सामना केला नसता, तर त्यांच्याकडे पुढच्या पिढीला खूण म्हणून दाखविण्यास स्मारक दगड मिळाले नसते.

त्याचप्रमाणे, बलपूर्वक जलदगतीने वाहत येणाऱ्या यार्देन नदीसारख्या भारी आव्हानांचा आपण सामना करावा म्हणून तो आपल्याला अनुमती देतो. ही आव्हाने केवळ आपला विश्वास वाढवण्यासाठीच नाहीत तर देव काय करू शकतो याची साक्ष देण्यासाठी देखील आहेत-आपल्यासाठी आणि येणाऱ्या पिढ्यांसाठी.

## २. तुझ्या निर्माणकर्त्याला आठीव! उपदेशक १२:१

हे वचन विशेषतः तरुणांना उद्देशून लिहिले आहे या दृष्टीने आपण पाहतो. खरंच, वचन नमूद करतं की, "**तू आपल्या तरुणपणाच्या दिवसांत तुझ्या निर्माणकर्त्याला आठीव...**" - उपदेशक १२:१. तथापि, केवळ तरुणच नाही तर आपल्या संपूर्ण आयुष्यभर आपण निर्माणकर्त्याची आठवण ठेवावी याबद्दल हे सूचित करतं.

बऱ्याचदा, आपण निर्मात्यापेक्षा निर्मितीला प्राधान्य देतो. पवित्र शास्त्र चेतावणी देते की, "**त्यांनी देवाच्या खरेपणाच्या बदली खोटेपण घेतले, आणि निर्माणकर्त्यापेक्षा त्यांनी निर्माण केलेल्या पदार्थाला अधिक पूज्य मानून त्याची सेवा केली. तो सर्वकाळ धन्यवादित आहे. आमेन.**" - रोम १: २५.

हे लक्षात न घेता, आपण अनेकदा ज्याने भौतिक गोष्टींची निर्मिती केली त्या निर्माणकर्त्या ऐवजी त्या भौतिक गोष्टींना अवाजवी महत्त्व देतो. देवाचे वचन आपल्याला आठवण करून देते: "**तर तुम्ही पहिल्याने त्याचे राज्य व त्याचे न्यायीपण मिळवायला झटा, म्हणजे त्यांवर ह्या सर्व गोष्टीही तुम्हांला मिळतील.**" - मत्तय ६:३३.


आपण स्रोत विसरतो! आपल्या विश्वासाचा लेखक आणि त्याला पूर्णत्वास नेणारा देव आहे. त्याने सर्वकाही निर्माण



*याकोब त्याच्या लाडक्या मुलासोबत.*

केले आणि आपल्या जीवनावर संपूर्णपणे नियंत्रण ठेवले. आपल्या जीवनातील प्रत्येक घटना ही एक दैवी उद्देश घेऊन येते. निर्माणकर्त्यावर विश्वास ठेवा, कारण तो सर्व गोष्टी मिळून हितासाठी बनवतो.

उदाहरण म्हणून आपण योसेफाची गोष्ट पाहूया. तो याकोबाचा लाडका मुलगा होता. याकोबाच्या म्हातारपणी त्याचा जन्म झाला होता आणि त्याची जपणूक इतक्या प्रेमाने केलेली होती की, त्यामुळे त्याच्या भावांना त्याचा हेवा वाटू



*योसेफाला एका कठीण मार्गातून जावे लागले.*

लागला. योसेफ एक स्वप्न पाहणारा होता, त्याला देवाकडून वचने आणि भविष्यवाण्या मिळाल्या होत्या की, एके दिवशी त्याचे कुटुंब त्याच्यापुढे नतमस्तक होईल. तथापि, योसेफ जिथे होता तिथे ही भविष्यवाणी पूर्ण होऊ शकत नाही हे देवाला माहित होते. एका प्रवासाची आवश्यकता होती.

याकोब योसेफाची अति काळजी घेणारा होता, म्हणून इजिप्तपर्यंत देवाची योजना कार्यरत होणार होती तिथपर्यंत त्याने त्याला कधीही जाऊ दिले नसते; योसेफाला एका कठीण मार्गातून जावे लागले: खाच, तुरुंग आणि शेवटी, राजवाडा. विनयभंगाचा खोटा आरोप आणि तुरुंगवास यांसारख्या परीक्षा असूनही, प्रत्येक परिस्थितीवर देवाचे नियंत्रण राहिले.

प्रिय मित्रांनो, कदाचित तुमच्या जीवनामध्ये अन्यायकारक गोष्टी घडल्या असतील. योसेफासारखे कदाचित तुम्हाला वेदनादायक अनुभव, अन्यायकारक वागणूक, अपमान किंवा विश्वासघात यांचा सामना करावा लागला असेल. परंतु लक्षात ठेवा की, तुमचा निर्माणकर्ता नियंत्रण ठेऊन आहे.

सुटकेच्या आशेने योसेफने एकदा प्यालेबरदाराला त्याची आठवण ठेवण्यास सांगितले. तरीही तो मनुष्य नाही तर देव होता, ज्याने योसेफला उदयास आणले. देवाने बंद केलेले दरवाजे उघडण्याची किंवा देवाने उघडलेली दारे बंद करण्याची शक्ती कोणाही माणसात नाही. देवाच्या अचूक वेळेवर विश्वास ठेवा, कारण "**त्याने सर्व काही त्या त्या समयी सुंदर केले आहे.**" (उपदेशक ३:११).

(...पान ६ वर)

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES
SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

स्तुती आणि प्रार्थनेचे विषय - १९ जानेवारी, २०२५ पासून ते १८ फेब्रुवारी, २०२५

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)

## ✝ याकरीता देवाची स्तुती करा...

**जानेवारी १९:** सहाय्यक संपादक आणि त्यांच्या कुटुंबियांना आशीर्वादित केल्याबद्दल देवाची स्तुती असो.

**जानेवारी २०:** आमच्या प्रार्थनेतील सहभागीदार, सदस्यत्व घेणारे सहभागीदार, विश्वासातील सहभागीदार, आयुष्यभर सोबत करणारे सहभागीदार, महान आज्ञेचे पालन करणारे सहभागीदार आणि त्यांचे सर्व कुटुंबीय या सर्वांवर देवाने त्याची दया आणि कृपा केल्याबद्दल देवाची स्तुती असो.

**जानेवारी २१:** गेल्या महिन्यातील आमच्या सर्व आर्थिक आणि आत्मिक गरजा पूर्ण केल्याबद्दल देवाची स्तुती असो.

**जानेवारी २२:** आमची मुख्य मंडळी आणि आमच्या इतर मंडळींच्या आणि त्यांच्या विश्वासणाऱ्यांच्या आशिर्वादाबद्दल देवाची स्तुती असो.

**जानेवारी २३:** आम्ही नियमितपणे धर्मशास्त्रविषयक चर्चासत्रे आयोजित करू शकलो याबद्दल देवाची स्तुती असो.

**जानेवारी २४:** आमची मुख्य मंडळी आणि आमच्या इतर मंडळ्यांमध्ये ख्रिसमस आणि नवीन वर्ष आम्ही आयोजित करू शकलो, आणि ते अर्थपूर्ण आणि प्रभावशाली पद्धतीने साजरे करण्यास देवाने सहाय्य केल्याबद्दल देवाची स्तुती असो.

**जानेवारी २५:** **सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूल, नहेम्या बायबल कॉलेज** आणि **थिऑलॉजिकल कॉरस्पाँडन्स कोर्सेस**च्या सर्व उपक्रमांबद्दल देवाची स्तुती असो.

**जानेवारी २६:** आमच्या ज्येष्ठ पाळकांच्या विविध सेवेद्वारे शुभवर्तमानाचा प्रचार करण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेबद्दल देवाची स्तुती असो.

**जानेवारी २७:** पाच मिनिटांच्या संदेशाद्वारे न पोहोचलेल्या लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी युट्युब वरील सेवेला देवाने आशीर्वादित केल्याबद्दल देवाची स्तुती असो.

**जानेवारी २८:** आमच्या प्रिंटिंग प्रेसमध्ये छापले जाणारे आणि प्रचाराच्या कार्यक्षेत्रांत पाठवले जाणारे १६ भाषांमधील आमच्या प्रकाशनाला लाभलेल्या देवाच्या आशिर्वादाबद्दल देवाची स्तुती असो.

**जानेवारी २९:** आमच्या '**एको ऑफ हिज कॉलच्या**' कर्मचारी वर्गाला आणि त्यांच्या कुटुंबियांना देवाने चांगले आरोग्य आणि दैवी संरक्षण देऊन आशीर्वादित केल्याबद्दल देवाची स्तुती असो.

**जानेवारी ३०:** आमचे समन्वयक, अनेक कार्यक्षेत्रांत काम करणारे प्रचारक आणि त्यांच्या कुटुंबियांना देवाने आशीर्वादित केल्याबद्दल देवाची स्तुती असो.

**जानेवारी ३१:** आमची मुख्य मंडळी आणि आमच्या इतर मंडळ्या यांचा पाळक वर्ग आणि त्यांचे वरिष्ठ वडील जन यांना देवाने आशीर्वादित केल्याबद्दल देवाची स्तुती असो.

**फेब्रुवारी ०१:** आमच्या हॉस्पिटलच्या सेवाकार्यात देवाने केलेल्या चमत्कारांबद्दल देवाची स्तुती असो.

**फेब्रुवारी ०२:** आमच्या मुख्य मंडळीतील बंधूंच्या सभेला देवाकडून मिळालेल्या आशिर्वादाबद्दल देवाची स्तुती असो.

**फेब्रुवारी ०३:** आमच्या **ग्लोबल व्हिजन फॉर युथ अँड कीड केअर सेंटर**ला देवाने आशीर्वादित केले त्याबद्दल देवाची स्तुती असो.

## ✝ कृपया यासाठी प्रार्थना करा...

**फेब्रुवारी ०४:** जगातील सर्व देशांमधून नवीन संसर्गजन्य रोगांच्या निर्मूलनाकरिता प्रार्थना करा.

**फेब्रुवारी ०५:** **एको ऑफ हिज कॉल** मधील तरुणांच्या सेवेकरिता आणि शुभवर्तमान प्रचाराच्या सेवेकरिता प्रार्थना करा.

**फेब्रुवारी ०६:** या वर्षी **एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीज**साठी आवश्यक असलेल्या निधीकरिता प्रार्थना करा.

**फेब्रुवारी ०७:** संपूर्ण जगातील महिला आणि लहान मुलांच्या सुरक्षिततेकरिता प्रार्थना करा.

**फेब्रुवारी ०८:** मिशनरी आणि देवाच्या सेवकांवरील हिंसाचार थांबण्याकरिता प्रार्थना करा.

**फेब्रुवारी ०९:** आमचे वरिष्ठ पाळक एस. सॅम सेल्वा राज आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्य सर्व प्रकारच्या वाईट शक्तींपासून सुरक्षित राहावे याकरिता प्रार्थना करा.

**फेब्रुवारी १०:** इस्राएल, पॅलेस्टाईन, रशिया आणि युक्रेनच्या शांतीकरिता प्रार्थना करा.

**फेब्रुवारी ११:** जे विद्यार्थी त्यांच्या सार्वजनिक शासकीय परीक्षांची तयारी करीत आहेत त्यांच्याकरिता प्रार्थना करा.

**फेब्रुवारी १२:** **सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूल** आणि **नहेम्या बायबल कॉलेज**च्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेकरिता प्रार्थना करा.

**फेब्रुवारी १३:** आमच्या कार्यालयातील कर्मचारी आणि प्रिंटिंग प्रेसमधील कर्मचाऱ्यांच्या उत्तम आरोग्याकरिता प्रार्थना करा.

**फेब्रुवारी १४:** आमचे सहाय्यक संपादक आणि त्यांच्या कुटुंबीयांकरिता प्रार्थना करा.

**फेब्रुवारी १५:** पृथ्वीवर त्याच्या राज्याच्या बांधणीसाठी आम्हाला प्राप्त झालेल्या दृष्टांतावर लक्ष केंद्रित करण्याकरिता प्रार्थना करा.

**फेब्रुवारी १६:** आजारपण, गरिबी आणि उपासमार यांचा संघर्ष करणाऱ्या लोकांकरिता प्रार्थना करा.

**फेब्रुवारी १७:** प्रत्येक व्यसनाधीन आणि वाईट कृत्ये करणाऱ्यांनी पश्चात्ताप करावा म्हणून त्यांची भेट घेण्याकरिता प्रार्थना करा.

**फेब्रुवारी १८:** संपूर्ण जगात शांतता प्रस्थापित व्हावी याकरिता प्रार्थना करा.

(पान ४ वरुन)

प्रत्येक परिस्थितीमध्ये तुमच्या निर्माणकर्त्याची आठवण करा. तो तुमचे शीर उंच करणारा आणि त्याच्या योजना पूर्ण करणारा आहे. पूर्णपणे त्याच्यावर विसंबून राहा. तो आपले भविष्य घडवतो: **''कारण मी तुम्हांविषयी जे संकल्प करीत आहे ते मी जाणतो; तुम्हांला शेवटी आशा द्यायला ते शांतीचे संकल्प आहेत आणि अरिष्टाचे नाहीत.''** – यिर्मया २९:११.

योसेफला त्याच्या भावांनी खाचेत टाकून पळून गेल्यानंतर हताश वाटले असावे. त्याला वाटले असेल, आता माझे भविष्य उरले नाही. देशातील एका प्रतिष्ठित व्यक्तीच्या पत्नीचा विनयभंग केल्याच्या खोट्या आरोपाखाली तुरुंगात असतांना त्याला आलेल्या निराशेची कल्पना करा. त्यातून सुटका होणे अशक्य वाटत होते. पोटीफरसारख्या प्रभावशाली व्यक्तीच्या समोर कोण कसा उभा राहू शकेल?

तरीही, योसेफच्या परीक्षांमध्ये देव कार्यरत होता. अनपेक्षित परिस्थितीत, देवाने फारोचा उपयोग योसेफची उन्नती करण्यासाठी आणि त्याचा मान वाढवण्यासाठी केला. पण हे परिवर्तन एका रात्रीत झालेले नाही. या सर्व गोष्टींद्वारे योसेफ पूर्णपणे देवावर भरवसा ठेवायला शिकला.

देव आजही तोच आहे. या वर्षी, तुमची उन्नती करण्यासाठी आणि तुमची आशा पुनर्स्थापित करण्यासाठी तो तुमच्या आयुष्यात योग्य लोकांना आणू शकतो. लक्षात ठेवा, तो तुमचे गौरव आणि तुमचे शीर उंचावणारा देव आहे. तुम्हाला तुमची परिस्थिती कितीही बिकट वाटत असली किंवा पुढे जाण्याचा मार्ग कितीही खडतर वाटत असला तरी तुमच्या निर्माणकर्त्यावर विश्वास ठेवा. तुमच्या मागण्याच्या आणि कल्पनेच्याही पलीकडे जाऊन तो कितीतरी अधिक कार्य करू शकतो.

## ३. तुम्हाला पुरवठा करणाऱ्याची आठवण करा!

**''आणि कदाचित तू आपल्या हृदयात म्हणशील की, माझ्या शक्तीने व माझ्या हाताच्या बळाने ही संपत्ती माझ्यासाठी मिळवली आहे; तर यहोवा तुझा देव याची तू आठवण ठेव, कारण संपत्ती मिळवायला तुला शक्ती देणारा तोच आहे....''** – अनुवाद ८:१७–१८.

अनुवाद ८ हा पवित्र शास्त्रामधील माझ्या आवडत्या परिच्छेदांपैकी एक आहे. हे वचन जणू एक प्रभावशाली स्मरणपत्र म्हणून काम करते म्हणजे, शक्ती, सत्ता, शहाणपण आणि यश असे आपल्याकडे जे काही आहे ते सर्व देवाकडून मिळते हे दर्शवते. हे वचन आपल्याला गर्व करण्याविरुद्ध चेतावणी देते, आणि कर्तृत्वाबद्दल बढाई मारू नये किंवा पुरवठा करणाऱ्याला विसरू नये असे सूचित करते.

हे वचन आपल्या अगदी अंतस्थ विचारांना संबोधित करते, ते म्हणते, कदाचित तू आपल्या हृदयात म्हणशील... देवाला माहित आहे की, कधी कधी आपली उद्दिष्ट्ये आणि कृती एकमेकांशी जुळत नाहीत. म्हणूनच ही चेतावणी केवळ शब्द नाही तर आपल्या हृदयातील विचारांना सुद्धा समाविष्ट करते.

या वर्षात पदार्पण करीत असताना, प्रत्येक परिस्थितीत तुमची गरज पुरवणारा देव आहे हीच तुमची प्रार्थना असावी. ज्या देवाने पाच भाकरी आणि दोन माशांच्या द्वारे पाच हजार लोकांना जेवू घातले तोच देव तुमच्या गरजा पूर्ण करण्यास समर्थ आहे हे लक्षात ठेवा.



*पाच भाकरी आणि दोन मासे- पुरेसे अन्न!*

तुमच्या घराचे व्यवस्थापन कसे होईल किंवा तुमच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा होईल याबद्दलची अनिश्चितता असणाऱ्या महत्त्वपूर्ण आव्हानांसह तुम्ही कदाचित या वर्षाची सुरुवात करीत आहात. देवाचे आश्वासन तुमच्या हृदयात प्रतिध्वनीत होऊ द्या: मी तुमचा पुरवठा करणारा देव आहे. घाबरू नका किंवा निराश होऊ नका. जर मी विधवा आणि तिच्या मुलाला उपासमारीच्या काळात थोडेसे पीठ आणि तेल पुरवून जिवंत ठेऊ शकतो, तर मी तुम्हालाही पुरवू शकतो.

## ४. तुमचा शब्बाथ लक्षात ठेवा!



*नव्या कराराचे ख्रिस्ती लोक पारंपारिकरित्या रविवार साजरा करतात!*

(...पान ८ वर)

शब्बाथ हा अनेकदा वादग्रस्त विषय ठरलेला आहे. शनिवार हा सातवा दिवस


ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE
REACHING NATIONS

# नहेम्या बायबल कॉलेजेस

चेपॉक आणि संतोषपुरम, वेलाचेरी, चेन्नाई

शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक

प्रवेशा करिता त्वरा करा !

माध्यम : तमिळ (अर्धवेळ)

हिंदी (निवासी) (स्पोन्सरशिप उपलब्ध)

ईश्वरविद्या डिप्लोमा

आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ठ पाळकांद्वारे ५५ वर्षांपासून मान्यता प्राप्त

संपर्क : अध्यक्ष : नहेम्या बाईबल कॉलेज

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.

Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858

E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

✲ ऑनलाईन क्लास उपलब्ध आहे ✲

## -: आमच्या मुख्यालयातील सेवाकार्या :-

१. प्रार्थना सेवा : २४ तास
२. **एको ऑफ हिज कॉल** : मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन
३. **बायबलकोर** : मुळभूत बायबल अभ्यासक्रम (इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी)
४. पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ
५. नहेम्या बायबल कॉलेज : (चेपॉक, संतोषपुरम आणि वेलाचेरी)
६. महान आज्ञापालनाचे भागीदार : (पाळकांचे नेटवर्क)
७. प्रशिक्षण कार्यक्रम : सेमिनार आणि रीट्रीटो
८. महासभा
९. छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा
१०. शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय : प्रकाशने
११. सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल : गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल
१२. रवीवारी शब्बाथ शाळा : सकाळी १०.३० आणि सायंकाळी३ वाजता-रविवारी (चेपॉक, वेलाचेरी, बालाजी नगर आणि संतोषपुरम)
**१३. सकाळची उपासना : रविवारी सकाळी ५.३० वाजता**
**१४. सुरुवातीची उपासना : रविवारी सकाळी ८.०० वाजता**
**१५. तामिळ उपासना : रविवारी सकाळी ८.३० वाजता**
**१६. युवा सभा : रविवारी दुपारी ११.०० वाजता**
**१७. सहभाग भोजन : रविवारी दुपारी १.०० वाजता**
**१८. हिन्दी उपासना : सायंकाळी ४ वाजता - रविवारी**
**१९. तेलगु उपासना : सायंकाळी ५ वाजता - रविवारी**
**२०. इंग्रजी आणि हिंदी उपासना : सायंकाळी ६ वाजता - रविवारी**
२१. अभिप्रायाची वेळ : सायंकाळी ७.३० वाजता - रविवारी
२२. स्त्रियांची प्रार्थना : सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी
२३. पुरुषांची प्रार्थना : सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी
२४. शिष्यत्वाची सभा : सायंकाळी ६ वाजता - शनिवारी
२५. गृह प्रार्थना सभा : सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी
२६. विशेष प्रभु भोजन : पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी
२७. सेवाकाची समालोचन सभा : सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार६
२८. पालकांची प्रार्थना : सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार
२९. रात्रभर प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शुक्रवार
३०. उपास प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शनिवार
३१. पवित्र सहभागिता : दुसऱ्या रविवारच्या उपासनेत
३२. तरुण/तरुणी/लहान लेकरांसाठी प्रार्थना : दररोज रात्रो १० वाजता (फोन द्वारा)
३३. कार्यालयीन स्टाफचे मनन : सकाळी ९ वाजता - दररोज
३४. कार्यालय : सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून)

## एको ऑफ हिज कॉल टपाल द्वारे अभ्यासक्रम

### केवळ भारतातील उमेदवारां करीता

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुर्वानिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. '**सर्टफिकेट इन मिनिस्ट्री**' प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

**अध्यक्ष - नहेम्या बाईबल कॉलेज**
**एको ऑफ हिज कॉल,** पोस्ट बॉक्स नं. २९५७,
चिपॉक, चैन्नई - ६०० ००५
फोन : (०४४) २८५२ ८२८२, २८५२ ९२९३,
फोन : ९८४१० ७१८५२, ९५६६१ ३१८५८
E-mail: biblecor@yahoo.co.in

## एको ऑफ हिज कॉल

### मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् ॲप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर "**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**" च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | | |
|---|---|---|
| **Account Name** | : | **ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST** |
| **Account Number** | : | **1023 2923 805** |
| **Bank Name** | : | **STATE BANK OF INDIA** |
| **Branch** | : | **TRIPLICANE, CHENNAI - 600 005** |
| **IFSC Code** | : | **SBIN 0000249** |
| **SWIFT Code** | : | **SBI NIN BB 455** |



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**''नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !'' (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

## ..... जे यहोवाला शोधतात त्यांना कोणतीही चांगली गोष्ट उणी पडणार नाही – स्तोत्र ३४:१०.

...Those who seek the LORD shall not lack any good thing. – Psalm 34:10.

१९६९ पासून जेव्हा आम्ही **एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीज** ही संस्था सुरु केली, तेव्हा आम्हाला आमच्या विविध सेवाकार्यांसाठी अर्थसहाय्याची गरज होती. कामगारांचे पगार, छपाईचे कागद, टपाल तिकिटे, दूरध्वनी शुल्क, वीज शुल्क, इमारतीचे भाडे, वाहतूक शुल्क, धर्मादाय इत्यादींसाठी पैशांची गरज होती.

वैयक्तिकरित्या सांगायचे, तर माझा प्रभु येशू ख्रिस्त माझ्यासाठी पुरेसा आहे. पैशाच्या अपेक्षेने आजपर्यंत मी कधीही कुणाचाही किंवा कोणत्याही कार्यालयाचा दरवाजा ठोठावला नाही. अगदी माझ्या मंडळीतल्या सदस्यांकडे किंवा मित्रांकडे जाऊन आर्थिक मदतीची विचारणा करण्याची मला देखील सवय नाही. पण आजपर्यंत, ज्या देवाने मला पाचारण केले, तो माझ्या सर्व गरजा त्याच्या स्वत:च्या मार्गाने चमत्कारिकरित्या पूर्ण करीत असतो.

गरजा आणि अडचणींच्या काळात, मी परिस्थितींकडे अशाप्रकारे पाहतो, जसे 'हीच सहन करण्याची माझी वेळ आहे', 'हीच वेळ जेव्हा देव मला प्रार्थना करण्यास भाग पाडतो' आणि ''प्रार्थनेत देवासोबतचे नातेसंबंध चांगले दृढ करण्याची हीच ती वेळ आहे.'' या अनुभवांनंतर मी मोठ्या चमत्कारांचा आनंद घेतला आहे. अशा परिस्थितीत, मला मदत करण्यासाठी देवाने अज्ञात लोकांना उभे केले आहे. अनेक वेळा देवाने माझ्यासाठी आणि माझ्या कुटुंबासाठी अनोळखी लोकांद्वारे जेवणाची सोय केली आहे!

१९७५ मध्ये, आमचे **एको ऑफ हिज कॉल** हे मासिक जिथे छापले त्या बापूजी प्रेसला मला ३०० रुपये द्यायचे होते. माझ्याकडे पैसे नसल्यामुळे त्यांचे पैसे देण्यास उशीर झाला. एका विशेष गुरुवारी, मी त्या प्रेसच्या मॅनेजरला पुढच्या सोमवारी मी पैसे देईन असे जरी सांगितले असले, तरी माझ्याकडे तेव्हा कोणतेच उत्पन्नाचे साधन नव्हते. मी माझ्या या गरजेसाठी देवाकडे प्रार्थना केली आणि शांत राहिलो. पुढच्या रविवार पर्यंत माझ्या गरजेनुसार माझ्याकडे पैसे नव्हते.

सोमवारी सकाळी, मी जेव्हा पोस्ट ऑफिसमधील माझा मेल बॉक्स उघडला तेव्हा मला दक्षिण भारतातील मदुराई आणि तुतीकोरीन यांच्यामध्ये वसलेल्या नागलापुरम या छोट्या गावातून आलेला एक लिफाफा सापडला. त्या लिफाफ्यात ३०० रुपयांचा बँक डिमांड ड्राफ्ट (जो क्रॉस केलेला नव्हता) होता. ते पैसे माझ्या त्या दिवसाच्या गरजेसाठी पुरेसे होते. मॅनेजरला सांगितल्याप्रमाणे प्रेसचे पैसे चुकते करण्यास देवाने मला सहाय्य पुरवले. देवाचे गौरव असो!

बऱ्याच वर्षांनी मी त्या व्यक्तीला नागलापुरम गावात भेटायला गेलो. माझ्यासाठी हे आश्चर्याचे होते की, तो चपला बनवणारा एक गरीब मजूर होता.

मला पाहून तो खूप खुश झाला. तो म्हणाला, ''सर, त्या एका विशिष्ट गुरुवारी मला असे वाटले की, कोणीतरी माझ्या मनाशी बोलत आहे, माझ्याकडे त्यावेळेस तेव्हढेच ३०० रुपये होते, जे मला **एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीज**ला पाठवण्यास भाग पाडले. म्हणून मी ते पैसे शुक्रवारी पाठवले आणि तुम्हाला सोमवारी मिळाले.''



अशा प्रकारे प्रभु येशू ख्रिस्त माझ्या जीवनात चमत्कार करतो.

होय, हा एक कठीण मार्ग आहे. तरीही, मी दररोज देवाच्या गौरवाच्या महानतेची साक्ष देण्यास सक्षम आहे. परमेश्वर माझा मेंढपाळ आहे. मला काही उणे पडणार नाही.

''**जो कोणी बुद्धिमान आहे तो ह्या गोष्टींकडे लक्ष देईल....**'' - स्तोत्र १०७:४३.

~~~~~~

(पान ६ वरुन)

आहे हे मी मान्य करीत असताना, नव्या कराराचे ख्रिस्ती लोक रविवार हा परंपरेने प्रभूच्या पुनरुत्थानाचा दिवस म्हणून पवित्र दिवस असा साजरा करतात.

मध्यपूर्वेतील अनेक देशांमध्ये मात्र शुक्रवार हा पवित्र दिवस पाळला जातो. जर तुम्ही त्या प्रदेशात राहत असाल तर, शुक्रवारी चर्चला जाणे हा सर्वसामान्य रिवाज बनतो.

माझा मुद्दा अगदी सरळ आहे: जर तुम्ही शुक्रवार, किंवा शनिवार किंवा रविवार दिवस साजरा करता, तर तो पवित्र पाळावा हे लक्षात ठेवा. देवाचे वचन सांगते, ''.... **यास्तव यहोवाने शब्बाथ दिवसाला आशीर्वाद देऊन तो पवित्र केला.**'' – निर्गम २०:११. त्या दिवशी ही आज्ञा देवाला प्राधान्य देण्याबाबत आहे. त्याच्याबरोबर अधिक वेळ घालवा,
~~~~~~

प्रतिदिन उपासनेसाठी आणि चिंतनासाठी समर्पित करा.

''शब्बाथ दिवशी विसावा घे.'' याचे भाषांतर काही जण चर्चमध्ये जाण्याऐवजी विश्रांती घेणे किंवा आरामदायी प्रवासाला निघणे असे करतात. परंतु, प्रिय मित्रांनो, मी तुम्हाला नम्रपणे विनंती करतो की, जे देवाचे आहे ते त्याला द्या. ....**जे कैसराचे ते कैसराला, व ''जे देवाचे ते देवाला भरून द्या.''** – मत्तय २२:२१. आठवड्यातील एक दिवस देवाचा आहे – तो व्यर्थ जाऊ देऊ नका.

दुर्दैवाने, आपल्यापैकी अनेकांनी आपले प्राधान्यक्रम उलटे केले आहेत. आपण देवाला उरलेले क्षण देतो; आपले त्याच्याकडे काही काम असेल किंवा आपली वैयक्तिक गरज असेल तरच त्याच्याकडे येतो. आपण पुढील कारणांनी याचे समर्थन करतो: मला काम करावे लागेल; नाहीतर माझी बिले कोण भरणार?, परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी मला रविवारी शिकवणीला हजर राहावे लागेल, मला एक सामना खेळायचा आहे, देवाने मला व्यावसायिकपणे कामगिरी करण्याची क्षमता दिली आहे.

ही कारणे योग्य जरी वाटत असली तरी, आपण स्वतःला विचारले पाहिजे: या निवडींमधून आपण कोणाचं गौरव करीत आहोत? पवित्र शास्त्र म्हणते, **''तुम्ही काहीही करता तर सर्व गोष्टी देवाच्या गौरवासाठी करा.''** – १ करिंथ १०:३१. आपण खरोखरच त्याचे गौरव करतो का? हा एक गंभीर प्रश्न आहे.

## ५. तू कोठून पडलास ते आठव!

पवित्र शास्त्र आपल्याला एक गंभीर चेतावणी देते : **''म्हणून तू कोठून पडलास ते आठीव, आणि पश्चात्ताप करून पहिली कामे कर; नाही तर मी तुझ्याकडे येईन, आणि तू पश्चात्ताप न केला तर तुझी दिवठणी तिच्या ठिकाणातून काढीन.''** – प्रकटी २:५.



**Repent and turn back to Me!**

या वर्षाच्या सुरुवातीला, आपण आपल्या जीवनाचे मूल्यमापन करण्यासाठी थोडेसे थांबूया. आपण कुठे कमी पडलो? सुरु करण्यासाठी, थांबण्यासाठी किंवा काही वेगळे करण्यासाठी आपल्याला कशाची गरज आहे? देव प्रेमाने आपल्याला त्याच्याकडे परत बोलावत आहे, विशेषतः आता.

त्याच्याकडे या. आपले दोन्ही हात पसरवून, प्रेम आणि आशेने भरून तो आपली वाट पाहत आहे. जरी आपल्याला वाटत असेल की, आपण त्याच्या प्रेमाच्या, दयेच्या किंवा कृपेच्या योग्य नाही आहोत, तर हे लक्षात ठेवा: आपल्याला त्याच्या कृपेची गरज आहे हे जाणून येशू वधस्तंभावर मरण पावला. त्याच्याशिवाय आपण काहीही करू शकत नाही.

तो आपल्या पापांची क्षमा करण्यास, आणि तुटलेल्या तुकड्यांना एकत्र करून त्यातून काहीतरी नवीन निर्मिती करण्यास तयार आहे. खरा प्रश्न हा आहे: आपण आपले भग्न जीवन त्याला समर्पित करावे व त्यातून त्याने सुंदर काहीतरी बनवावे अशी आपली इच्छा आहे का?

हे वर्ष तुम्हांस प्रभुमध्ये भरभराटीचे व समृद्धीचे जावो. तुम्ही त्याच्या प्रेमाने अनेकांच्या जीवनाला स्पर्श करीत राहावे आणि तुमच्या सभोवतालच्या जगामध्ये बदल घडवून आणत येशू ख्रिस्ताचा प्रकाश तुमच्यातून चमकत राहावा ही सदिच्छा.

********


# तातडीची गरज

**एको ऑफ हिज कॉलची जलदगतीने वाढ होत आहे. आम्हाला मिशन विचारसरणी असलेले; समर्पित आणि विश्वासू पुरुष आणि स्त्री उमेदवार खालील पदांकरीता हवे आहेत.**

- ➪ मुख्य मंडळी करिता पूर्ववेळ सहकारी पाळक
- ➪ चेन्नाईमधील शाखा मंडळ्यांकरिता पूर्ववेळ सहकारी पाळक
- ➪ पूर्णवेळ सुरक्षा रक्षक
- ➪ डी.टी.पी. चालक आणि टंकलेखक
- ➪ इंग्रजी आणि इतर भाषा बोलू आणि लिखाण करु शकणारे व्यावसाईक
- ➪ व्यवस्थापनात इच्छुक असलेले कार्यालय मॅनेजर
- ➪ पूर्ववेळ बायबल कॉलेजकरिता व्याख्याते
- ➪ आमचे सेवाकार्याची ओळख करुन देणारे स्वयंसेवक
- ➪ पूर्ववेळ वाहन चालक
- ➪ मॅट्रीक्युलेशन शाळेकरिता प्रिन्सीपल आणि शिक्षक
- ➪ पूर्ववेळ स्वयंपाकी (स्त्री उमेदवार)
- ➪ पूर्ववेळ स्वच्छता पाहणारे कर्मचारी वर्ग

**वेतन :- अनुभव आणि पात्रतेवर आधारीत**

**एको ऑफ हिज कॉलला अर्ज करा**
वॉटस्अप नंबर : 98412 71858
ईमेल : sam@echoofhiscall.org

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/24-26 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/24-26

## Echo of His Call

**YouTube**
Please subscribe

Kindly view and subscribe our **Echo of His Call YouTube Channel** when you get time. Thanks.

**- Editor**

## OUR BANK DETAILS:

***1. Bank : State Bank of India***

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **S. Sam Selva Raj**
A/C No. : **1023 2934 679**
IFSC : **SBIN 00 00 249**
SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

***2. Bank : ICICI Bank***

Branch : **Anna Salai, Chennai-6**
Name : **Echo of His Call**
A/C No. : **6038 0502 2319**
IFSC : **ICIC 000 6038**

***3. Bank : State Bank of India***

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **Echo of His Call Educational Trust**
A/C No. : **1023 2923 805**
IFSC : **SBIN 00 00 249**

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**
*****
**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-    आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps (**Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.**) to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

**RNI NO. 70106/98**
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/24-26**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/24-26**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 13th JANUARY 2025.**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

***JESUS LOVES YOU!***

To

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers,** New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**